Vol 5 Issue 3 Sept 2015

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

# Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

**Golden Research Thoughts** Impact Factor : 3.4052(UIF)
ISSN 2231-5063 Volume - 5 | Issue - 3 | Sept - 2015

# *रविकिरणमंडळाचे कार्य व मूल्यमापन*




*शांताराम शेलार*

***सारांश :***


रविकिरणमंडळाच्या उदयाबरोबरच मराठी साहित्यात त्याच्या अमोल कार्याचा ठसा स्पष्टपणे जाणवतो. कवींचा एक समूह परस्परांशी चर्चा करून काव्यरचना करू लागला, हे एक नवलच म्हणायचे

***प्रस्तावना :***

मंडळाच्या काव्य कर्तृत्वाच्या प्रशंसेबरोबरच त्यावर टीकाही झाली. मंडळाला विरोध करणारे समकालीन कवी व टीकाकार यांनी प्रखर स्वरूपात प्रतिकूल स्वरूपाची टीका केली. त्यामध्ये 'बा.अ.भिडे', 'आचार्य अत्रे', 'कुसुमावती देशपांडे' यांच्या टीकेचा समावेश होतो. समकालीन कवींनीही काव्याच्या संदर्भात टीका केली. त्यामध्ये 'भा.रा.तांबे ', ' बी ' 'चंद्रशेखर' 'अनिल', 'बा.भ.बोरकर' 'कुसुमाग्रज' यांच्या टीकेचा विचार करावा लागतो. अग्रगण्य टीकाकारात 'ग.त्र्यं. माडखोलकर', 'द.सी. पंगू.' 'श्री.के.क्षीरसागर', 'वि.स.खांडेकर', 'रा. श्री. जोग', 'भ. श्री. पंडित' इ. मर्मज्ञ टीकाकार होते.

रविकिरणमंडळ हे गडकरी संप्रदायाचे विरोधक म्हणून मानले जाते. कारण ' निरर्थकता व कृत्रिम स्वरूपाची रचना व निष्फळ भावनाविवश म्हणून रूढ होत चाललेल्या दुष्ट प्रकारांना एक प्रकारे आळा घालून शास्त्रशुध्दरितीने अभ्यास करून कवितेचे अंतरंग उन्नत करणे, हे रविकिरणमंडळाचे ध्येय होते.

गडकरी संप्रदायाच्या संस्कारशील प्रभावी वातावरणाचा व संस्काराचा रविकिरणमंडळाच्या साहित्यावर खचितच परिणाम झाला, याचा अर्थ गडकरी संप्रदायाच्या कवितेचे अनुकरण किंवा प्रेरणा मंडळाच्या कवितेला मिळाली., असे म्हणता येत नाही. गडकऱ्यांची कविता श्रेष्ठ दर्जाची मानली जाते. त्यातील काव्यकल्पनापेक्षा रविकिरणमंडळाच्या काव्याच्या कल्पना वेगळया आहेत.




रविकिरणमंडळाने आपल्या कवितांना स्वतंत्र चाली दिल्या, गेयता आणल्याने त्यामध्ये जातिवैचित्र्य आले. कवींचा मुख्य भर हा मुद्रिका, मोहिनी, आशीर्वाद, यासारख्या जातीवर आणि गज्जलांवर होता.

कविता ही चीज अलौकिक स्वरूपाची समजली जात होती. कवींच्याभोवती एक विशिष्ट प्रकारचे गूढ वातावरण निर्माण झाले होते. समाज कवींना दैवी शक्ती लाभलेला दूत समजत असे. सर्वसामान्यांच्या मते कविता समजायला व कळायला जड जात होती.

रविकिरणमंडळाने समाजात लोकांच्यासमोर कविता रसिकांच्या समुदायात आणून सोडली. सर्व सामान्यांना ऐकविली. मनातील कविता मौखिक स्वरूपात प्रकट झाली, त्यामुळे काव्यातही क्लिष्ट वाटणारा प्रकार रविकिरणमंडळाच्या नवीन काव्यप्रयोगांनी परिचित होऊन जनसामान्यांची वृत्ती अभिरूचिसंपन्न झाली. संघटनेचे बळ कवितेला लाभले फक्त संघटना हेच बळ असा समज झाल्याने रविकिरणमंडळातील कवींचे वैयक्तिक बळ ध्यानात घेतले गेले नाही.

रविकिरणमंडळाला जे यश मिळाले, ते संघटनेच्या बळाने व काव्यगायनाने असाही समज पसरला आहे. त्यातील स्नेह व जिव्हाळा महत्त्वाचा मानला जातो. रविकिरणमंडळाने महाराष्ट्रामध्ये एक अभूतपूर्व अशी काव्याची वाङ्मयीन स्वरूपाची चळवळ उभी केली. ही वाङ्मयीन सेवा मराठी काव्यइतिहासात अलौकिक समजली जाते.

'रविकिरणमंडळाने फक्त वाचक गृहीत धरला आणि कविता लिहिली' अशी टीका कुसुमावती देशपांडे करतात. तसे पाहिले तर कुसुमावतींचे उद्‌गार बरोबर वाटतात. कारण वाचक समोर ठेवून म्हणजे केवळ रंजनात्मक कविता लिहिली. ' मागणी तसा पुरवठा ' या न्यायाने लोकांना जे रूचेल ते देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. स्वतःच्या प्रेरणांशी एकनिष्ठ राहून त्यांची कविता प्रकट झालेली नव्हती.

रविकिरणमंडळाने वाचक जरी गृहीत धरला तरी रविकिरणमंडळाच्या काव्याची गोडी नवीन होती. परंपरागत कधीच नव्हती. कविता ऐकायला रसिक वर्ग उत्सुतेने जमत होता. काव्यगायनाचे दौरे जोमाने होत होते. कवी ' सुमंत ' यांच्यापासून सुरू झालेली काव्यगायनाची प्रथा हळूहळू अधिक रूढ झाली. महाराष्ट्राबाहेरही काव्यगायन यशस्वी झाले. 'कवी यशवंत व गिरीश' (यशोगिरी) या जोडगोळीने काव्यगायनाने अमाप यश मिळविले.

'कुसुमावती देशपांडे' यांच्या वरील टीकेवर कुसुमाग्रज – वि.वा. शिरवाडकर यांची प्रतिक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. ते असे म्हणतात. ''प्रस्तुत कालखंडातील कवींनी वाचक गृहीत धरला असे उद्‌गार सौ. कुसुमावती देशपांडे यांनी काढले आहेत. नुसता वाचक गृहीत धरून फारसे बिघडले नसते. तो केशवसुतांनीहि गृहीत धरला आहे आणि तांब्यानीहि येथून पुढे गृहीत धरण्यात आला, तो ' श्रोता ' या काळात सुरू झालेली श्रोत्यांची कारकीर्द कांही प्रमाणात अद्यापहि चालू आहे. काव्यगायनाची जागा काव्यवाचनाने आणि गेयतेची जागा नाटयाने घेतली आहे एवढेच''

' श्रोता ' हा कवितेकडे आकर्षिला गेला काव्यगायन, गेयता व नाटय असा बदल काव्यात झाला, तो रविकिरणमंडळाच्या काव्यवाचनाने, रविकिरणमंडळावर झालेल्या प्रतिकूल टीकेचा विचार करता 'बा.अ.भिडे' यांची प्रखर व प्रहार करणारी टीका रविकिरणमंडळाच्या उदयाबरोबरच गाजली. ' किरण ' या रविकिरणमंडळाच्या पहिल्याच पुस्तकावर त्यांनी कडाडून हल्ला केला. याचा परिणाम तसा प्रतिकूल होण्याऐवजी अनुकूलच झाला. त्यामुळे काव्याची प्रसिध्दी झपाटयाने झाली. नंतर मात्र 'बा.अ. भिडे' यांनी मंडळातील कवींचे काव्यगुण मान्य केले.

'आचार्य अत्रे' यांनी झेंडूची फुले या विडंबनात्मक काव्यातून मंडळाच्या सदस्यांच्या स्वभाव दोषावर बोट ठेवले. काही गाजलेल्या कवितांचे उत्कृष्ट विडंबन केले. त्या विडंबनाचा परिणाम काय झाला, याविषयी भाऊसाहेब माडखोलकर म्हणतात. ''मी तर असे म्हणेन की आचार्य अत्रे यांनी ' झेंडूची फुले ' लिहून रविकिरणमंडळाची जी शोभा केली, तिचा मराठी वाङ्मयावर आणि त्या काळातील तरूण कवींवर अतिशय चांगला परिणाम झाला''.

रविकिरणमंडळाच्या साहित्यामुळे आचार्य अत्र्यांच्या झेंडूच्या फुलांचा जन्म झाला, एवढेच नाही तर अत्रे विडंबनकार झाले, याचे श्रेय ते रविकिरणमंडळाला देतात. तेथून त्यांनी विडंबनाच्या माध्यमातूनच आपली टीका केली.

रविकिरणमंडळावर झालेल्या टीकेचा अनुकूल परिणाम साहित्यातून दिसू लागला. तो असा की, रविकिरणमंडळाच्या कार्यापासून अनेक मराठी कविमंडळाची निर्मिती झाली. रविकिरणमंडळाच्या कवितेच्या प्रभावामुळे कवितेत बदल अपेक्षित होता. प्रेमविषयक कवितामध्ये रविकिरणमंडळाने व्यापकता आणण्याचा प्रयत्न केला. विशेषतः मंडळाचा स्त्रीविषयक दृष्टिकोन काव्यरचनेतून नाविन्य प्रकट करणारा आहे. फार्सी साहित्याच्या अनुकरणातून माधवराव पटवर्धनांनी काही नवीन असे बेबंदपणाचे सूर आणले.

अर्वाचीन मराठी कवितेच्या विकासातील एक महत्वपूर्ण टप्पा म्हणून रविकिरणमंडळाचे महत्त्व विशेष आहे. रविकिरणमंडळाचा काळ हा राष्ट्रीय चळवळीचा होता. पारतंत्र्यामुळे सर्वत्र असंतोष होता. 'असहकारितेची चळवळ', 'बहिष्कार', 'चलो दिल्ली', 'अहिंसावाद', 'भारत छोडो' वगैरे आंदोलने, घोषणा व ऐक्याचे प्रयत्न चालू होते. पारतंत्र्यामुळे सर्वत्र अस्वस्थता पसरलेली होती.

तरूणवर्ग स्वातंत्र्य मिळवण्यासाठी आहोरात्र धुमसत होता. अनेकमार्गाने भारतीयांचा इंग्रज सत्तेशी संघर्ष चालू होता. देशाचे राष्ट्रीय व सामाजिक जीवन ढवळून निघाले होते. देशाला स्थिरता प्राप्त होणे कठीण होते. अशा परिस्थितीत रविकिरणमंडळाच्या कवितेने क्षीण सुरात का होईना आपली राष्ट्रभक्ती प्रकट केली आहे.

मंडळाच्या कारकिर्दीच्या मानाने 'राष्ट्र व समाज' यांचे प्रतिबिंब मंडळाच्या कवितेत जोमाने उमटले नाही. याला एक कारण म्हणजे मंडळाची कविता विशेषकरून कौटुंबिक, सामाजिक व वैयक्तिक स्वरूपाची वाटते. सांस्कृतिक मूल्यांचे वर्धापन किंवा संगोपन अधिक प्रमाणात व्हायला हवे तो, ते झाले नाही. राष्ट्रीय मूल्यांची जोपासना कवितेतून नेटाने आविष्कृत झाली नाही.

बहुतेक समीक्षकांनी माधवराव पटवर्धनांना मंडळाचे ' रवी ' असे म्हटलेले आहे व बाकी सर्व ' किरणे ' होत असा ठाम विचारही व्यक्त केलेला आहे. ते तसे बरोबर आहे. कारण माधवराव पटवर्धनांचे साहित्य पांडित्य व विद्वत्त्व या गुणांनी युक्त आहे.

रविकिरणमंडळाने जगलेले व प्रत्यक्ष अनुभवलेले जीवन अधिक सूक्ष्मरितीने काव्यातून प्रकट करण्याचा प्रयत्न केला. तरीहि या मंडळाच्या काव्याच्या काही मर्यादा आहेतच. उदा. अनुभव अधिक बारकाव्यानिशी येऊ लागले. तपशिलाचे बारकावे आले तरी सखोलता अगर सूक्ष्मता आली नाही. किंबहुना नुसतेच बारकावे येऊ लागल्याने, ही कविता कसाच्यादृष्टीने सत्त्वहीन व आविष्कारात बाह्यांगाने सजवलेली वाटते. त्यामध्ये कृत्रिमता अधिक जाणवते. उत्कटता कमी प्रमाणात प्रकट झालेली दिसते.

रविकिरणमंडळाच्या काव्याविषयी रा. श्री. जोग म्हणतात, ''मंडळाच्या मुख्य तीन सदस्यांची काव्यरचना विपुल आहे. ती दीर्घ स्वरूपाची खंडकाव्यात्मक आणि स्फुट भावगीतात्मक अशी दोन्ही प्रकारची आहे. परंतु स्फुट भावगीत लेखक म्हणूनच त्यांचे

काव्य अधिक झाले आहे. म्हणून नवीन कवितेच्या संप्रदायातच ते बसतात. 'केशवसुत आणि रविकिरणमंडळ' यांच्या काव्यविषयक दृष्टिकोनात मूलभूत असा कोणताच भेद नाही. 'काव्य म्हणजे कवीचा आत्माविष्कार व तो स्फुट कवितेमधून करणे', हीच त्याचीही काव्यविषयक कल्पना होती[1] रा. श्री. जोगांचे हे विवेचन मंडळाच्या काव्यविषयक भूमिकेवर प्रकाश टाकणारे आहे. मंडळाच्या कार्याबद्दल ते म्हणतात –

'' राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या धामधुमीच्या काळात जरी या मंडळाने विचारक्रांती घडवून आणण्याचे प्रयत्न केलेले नसले तरी केशवसुतांची परंपरा पुढे चालवून त्या परंपरेला अधिक कलापूर्ण अधिक विविधतायुक्त, अधिक आकर्षक, अधिक लोकप्रिय करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले आहे.[2]

साधारण विषयावर व सर्वसामान्यांच्या भावना मंडहाच्या काव्याचा विषय झालेला आहे. कविता साधारण असली तरी ती वास्तवपूर्ण रीतीने प्रकट झालेली वाटते. भ.श्री. पंडितांचा मंडळाच्या कार्याविषयीचा अभिप्राय तितकाच महत्त्वाचा वाटतो. ते म्हणतात ''चवथ्या पिढीतील कवींनी व्यक्तिगत शैलीचा अवलंब तर केलाच, परंतू कविता लिहिली ती वैयक्तिक स्वरूपाची, तिच्यात अनेकदा त्यांच्या खाजगी जीवनाचे निदर्शन आहे. क्षुल्लक भावनांचे प्रदर्शन आहे. व्यर्थ आत्मपौढी आहे. निराधार समर्थन आहे आणि समाजास सकारण शिव्याशाप आहेत. याचा अर्थ असा नाही की, त्यांची सर्वच कविता या प्रकारच्या संकुचीत भावनांनी भरलेली आहे. त्याच्या अनेक कवितामध्ये व्यापक भावनाचाही आविष्कार झाला आहे. परंतु हा काळ व्यक्तिवादाचा असल्यामुळे त्यांच्याकडून मुख्यतया वैयक्तिक स्वरूपाची कविता लिहिली गेलेली आहे.[3]

वरील विवेचनावरून असे म्हणता येईल की ''मंडळाच्या कवितेत संकुचित व अल्पभावना, व्यक्तिवाद, वैयक्तिक सुख इ. चा अवलंब झालेला दिसतो. तरीही ती कविता त्या मंडळाचीच राहिली. ती खाजगी किंवा टाकाऊ झाली नाही. त्याला तो काळही जबाबदार आहे. रविकिरणमंडळाचा काळ ' स्वान्तःसुखाय', वाङ्मय रचनेचा होता''.[4] जी काव्यनिर्मिती झाली, ती कलात्मक आविष्कार म्हणून पूर्ण होऊ पहात होती.

सर्व प्रकारच्या टीकेचा विचार करता 'कुसुमावती देशपांडे' यांची टीका प्रतिकूल असून एका विशिष्ट टोकाची आहे, असे जाणवते. ''कवितेला एक प्रकारे लोकाभिमुख करणे, लोकांच्या रोजच्या जीवनातील साध्या अनुभवांना व्यक्त करणे या उद्दिष्टामुळे मंडळाचे काव्य सामान्यलोकांपर्यंत पोहचू शकले.''[5] त्यामुळे वाचकाना कविता अधिक सोपी झाल्याचे जाणवले. एका अर्थी कवितेचा रसास्वाद घेणे सहज व सोपे झाले. असेच म्हणावे लागेल.

आधुनिक मराठी कवितेच्या विकासात मंडळाने मोलाचे व महत्त्वपूण्र कार्य केले आहे. मराठी साहित्याच्या इतिहासामध्ये रविकिरणमंडळाच्या काव्याचा व इतर साहित्याचा ठसा कायमचाच आहे. रविकिरणमंडळाची एक स्वतंत्र अशी कविता ओळखली जाते. यातच तिचा लौकिक व सामर्थ्य एकवटलेले आहे. मंडळाने 'स्फुट काव्य' व 'खंडकाव्य' यामधून साहित्याला विविधता प्राप्त करून दिली. नवीन रचना प्रयोग व अभिनव काव्यविषय, खंडकाव्याची कलात्मक गुंफण, यामुळे इतर कवितेपेक्षा प्रस्तुत कविता वेगळी ठरते. रविकिरणमंडळाला वगळून मराठी साहित्याचा इतिहास जुळविता येणार नाही. समकालीन कवींचा अभ्यास करतानाही रविकिरणमंडळाच्या काळाचा व साहित्याचा अभ्यास आवश्यक ठरेल, या दृष्टीने मंडळाचे मोल चिरंतन राहील.

### *संदर्भ – टीपा*

1) मनोहर – ऑक्टोबर 1959 – रौप्यमहोत्सवी विशेषांक पृ. 51 (आजकालची कविता, लेखक – वि.वा.शिरवाडकर)
2) उनि ............................ पृ.51
3) उनि ............................ पृ.51
4) उनि ............................ पृ.53
5) बातचीत – भाऊसाहेब माडखोलकरशी. भास्कर नंदनवार, विजय प्रका., नागपूर आ.प्र. 27 डिसें. 1956 पृ. 77

### *संदर्भ ग्रंथ*

1) रविकिरणमंडळ गौरविका – ले. – कमुदिनी घारपुरे पुणे विद्यापीठ प्र.का.1965
2) दोन तपे – ग.त्र्यं. माडखोलकर –मॅजेस्टीक बुकस्टॉल मुंबई 1945
3) अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक – प्र.खं.,व्हीनस प्रका.,पुणे 1966
4) दिवस असे होते. वि.द.घाटे, मौज प्रका., मुंबई 1961
5) सहकंप – पोतदार अनुराधा – (प्रस्तावना ) मेहता पब्लिसिंग हाऊस पुणे 1982
6) रविकिरणमंडळाच्या वाङ्मयीन कार्याचे मूल्यमापन – (टंकलिखित प्रबंध), – मुंबई विद्यापीठ, 1974
7) आधुनिक कवी –पु..1 ले – शिखरे दा. न. जयंत आणि कंपनी, नवी पेठ पुणे, 1968

// Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org